▪ दीपा भंडारे

**धुळ्याचे इतिहासतज्ज्ञ आणि समर्थ वाङ्मयाचे गाढे अभ्यासक समर्थहृदय कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी ग्रंथराज दासबोधाची जन्मभूमी असणाऱ्या शिवथरघळच्या पार्श्वभूमीचा शोध लावला. या घटनेला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. उद्या, १६ फेब्रुवारीला माघ शुद्ध नवमी अर्थात दासबोधजयंतीला शिवथरघळ शोधाचा शतकपूर्ती महोत्सव साजरा केला जात आहे. त्यानिमित्त...**



# दासबोधाच्या 'ज्ञानभूमी'ची शतकपूर्ती

मानवी जीवनाचं सर्वांगीण दर्शन घडवून त्याच्या उन्नयानाचा मार्ग दाखवणारा समर्थ रामदास स्वामींचा 'ग्रंथराज दासबोध' हा महाराष्ट्रात 'जीवनग्रंथ' म्हणून ओळखला जातो. गेली साडेतीनशे वर्षे अनेक पिढ्या, संतसत्पुरुष आणि राष्ट्रभक्त क्रांतिकारी महापुरुषांची 'अमृत संजीवनी' ठरलेल्या या दासबोधाची जन्मभूमी म्हणजे 'शिवथरघळ.'

परमार्थ आणि पुरुषार्थ यांचा अद्वितीय संगम असणाऱ्या समर्थांच्या तेजस्वी जीवनात महाराष्ट्रातील काही स्थानांना अतिशय महत्त्व आहे. मराठवाड्यातील 'जांब समर्थ' ही समर्थांची 'जन्मभूमी' नाशिक टाकळी ही 'तपोभूमी', चाफळ खोरं आणि सज्जनगड ही 'कर्मभूमी,' तर शिवथरघळ ही दासबोधाची जननी अर्थात 'ज्ञानभूमी' आहे. समर्थांच्या निर्याणानंतर सुमारे सव्वादोनशे वर्षांनी म्हणजे १९१५ मध्ये धुळ्यातील थोर इतिहासतज्ज्ञ, संशोधक, समर्थहृदय कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी या शिवथरघळीच्या पावनभूमीचा शोध लावला.

समर्थ अत्यंत निसर्गप्रेमी होते. हिरव्यागार वनश्रीने नटलेली गिरिकंदरे, धबधबे आणि नद्यांच्या रम्य परिसरात म्हणजेच चाफळ महाबळेश्वरच्या खोऱ्यात समर्थांनी दीर्घकाळ वास्तव्य केलं. ते जसे निसर्गप्रेमी होते तसे एकांतप्रियही होते. किंबहुना निसर्ग आणि एकांत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ईश्वरप्राप्ती आणि साधनेसाठी एकांत निसर्गातच उपलब्ध होत असल्याने समर्थांनी मानवी जीवनाचं सखोल चिंतन आणि ध्यानधारणा, साधना करण्यासाठी महाबळेश्वर खोऱ्यातील अनेक निसर्गसंपन्न घळींचा उपयोग केला. घळ म्हणजे नैसर्गिक गुहा. डोंगराच्या उंच कड्यावरून कोसळणाऱ्या धबधब्यामुळे त्याच डोंगराच्या खालच्या एखाद्या शिळेवर पाण्याचे लोट आदळून विवर तयार होते. हे विवर म्हणजेच घळ होय. घळीचं वैशिष्ट्य म्हणजे तिथे दिवसा गारवा आणि रात्री ऊब असते. समर्थांच्या वाङ्मयात त्यांना एकांताची आणि घळींची असलेली आवड दिसून येते.

महाबळेश्वर चाफळ खोऱ्यात समर्थांनी वास्तव्य केलेल्या रामघळ, मोरघळ, हेळवाक घळ, तारळे घळ, शिवथरघळ या सर्व घळी प्रसिद्ध आहेत.

रायगड जिल्ह्यातील महाडपासून ३० किलोमीटर अंतरावर असणारी शिवथरघळ म्हणजे निसर्गसौंदर्याची आणि आनंदाची मुक्त उधळण करणारे विलोभनीय स्थान! सह्याद्रीच्या अजस्त्र कड्यांमध्ये दऱ्याखोऱ्यांनी आणि घनदाट जंगलांनी वेढलेला हा जावळीच्या खोऱ्याचा निसर्गरम्य परिसर. राजगड, रायगड, तोरणा, प्रतापगड आणि संपूर्ण जावळी खोऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण असा 'कावळा किल्ला' अशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा हा परिसर, मर्दमराठ्यांच्या शौर्याचीही आठवण करून देतो. आजदेखील पावसाळ्यात नयनरम्य असणारा आणि तरुणाईसह आबालवृद्धांना आकर्षित करणारा वरंध घाटासह शिवथरघळीच्या जावळी खोऱ्याचा हा परिसर १६४४ ते १६८२ या काळात किती निसर्गसंपन्न असेल याची कल्पना करता येते. म्हणूनच समर्थांनी आपल्या आवडत्या अशा शिवथरघळीच्या ठिकाणी दीर्घकाळ वास्तव्य करून आपली श्रेष्ठ वाङ्मयीन ग्रंथमूर्ती घडवली. शिवथरघळीच्या डोंगरातील प्रशस्त गुहेच्या कड्यावरून सुमारे शंभर फूट उंचीवरून कोसळणारा प्रचंड धबधबा, तर या स्थानाचं भूषण आहे. पावसाळ्यात हा प्रचंड जलप्रपात भगवान शंकराच्या तांडव नृत्याची आठवण करून देतो. घळीत उडणारे त्याचे थंडगार तुषार आणि त्याच वेगाने पडणाऱ्या जलस्रोताचा 'ध्वनिकल्लोळ' आपल्याला अंतर्बाह्य सुखावतात. म्हणूनच समर्थांना या स्थानाचं जास्त आकर्षण वाटलं असावं. शिवथरच्या या मनोहारी स्थळाचं वर्णन करताना समर्थांच्या काव्यस्फूर्तीलाही बहर आला.

शिवथरघळीच्या धबधब्याप्रमाणे समर्थांची प्रतिभा आणि कवित्व या स्थानी खऱ्या अर्थाने बहरलं. आसेतूहिमाचल १२ वर्षे भारतवर्षाचं देशाटन केल्यानंतर याच काळात त्यांना झालेलं देशकाळ परिस्थितीचं अवलोकन, समाजातील विविध वृत्तीप्रवृत्तींच्या माणसांच्या जीवनाचं दर्शन, धर्म आणि राजकारण याचं केलेलं विश्लेषण; तसंच स्वत: खडतर साधना करून वेद, उपनिषदे, गीता, भागवत आदी ग्रंथांचा अभ्यास करून घेतलेली आत्मप्रचिती, या सर्वांच्या मंथनातून शिवथरघळीच्या एकांतवासात समर्थांच्या मुखातून दासबोधाचे ओवीबद्ध अमृतबोल बाहेर पडले आणि त्यांचे शिष्योत्तम योगीराज कल्याणस्वामी यांनी ते अक्षरबद्ध केले. रामराज्याचं अर्थात हिंदवी स्वराज्याचं स्वप्न उराशी बाळगून ईश्वरभक्ती आणि राष्ट्रकारण यांच्या सोबतीनं समर्थांनी स्वस्थचित्ताने दासबोधाचं लेखन केलं. ऐतिहासिक कागदपत्रांनुसार समर्थ १६५४ मध्ये (काहींच्या मते १६५२) शिवथरघळीत वास्तव्यास आले. एकूण सहा वर्षे म्हणजे १६६० पर्यंत त्यांचे तिथे सलग वास्तव्य होतं. १६५५ च्या सुमाराला शिवथरघळीच्या वरच्या बाजूला जावळीचा सरदार चंद्रराव मोरे यांची वस्ती असताना शिवाजी महाराजांनी त्याच्यावर आक्रमण करून त्याचा खात्मा केला तेव्हा समर्थांचे वास्तव्य शिवथरघळीतच होते हे सूचक मानलं जातं. आजही घळीच्या वरच्या डोंगरावर चंद्रराव मोऱ्यांच्या वाड्याच्या खुणा अस्तित्वात असून, 'मोरे वस्ती' आहे. १६७२ तें १६७६ या कालखंडातही समर्थांचं या स्थानी पुन्हा वास्तव्य झाल्याचं मानलं जातं.

२० व्या शतकात १९०२ पासून धुळ्याचे थोर इतिहासतज्ज्ञ, समर्थहृदय कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी देशभर पसरलेल्या समर्थांच्या मठ आणि इतर वास्तव्यस्थानांचा शोध घेऊन समर्थांची आणि त्यांच्या शिष्यांच्या ग्रंथसंपदेची सुमारे साडेचार हजार हस्तलिखिते मिळवली. कष्टप्रद संशोधन करून अस्सल कागदपत्रांच्या आधारे माहितीचा फार मोठा खजिना त्यांनी पुढील पिढ्यांसाठी उघडून ठेवला. हजारो कागदपत्रांचं योग्य पद्धतीने जतन करण्याचं आणि ते पुनर्प्रकाशित करण्याचं फार मोठं अलौकिक कार्य कै. देवांनी केलं. यासाठी धुळ्यात 'श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर' या संस्थेची स्थापना केली. याद्वारे समर्थांच्या विविधांगी साहित्याचे आणि व्यक्तिमत्त्वाचे पैलू आज ग्रंथरूपाने आपणासमोर असताना कै. देवांच्या वाचनात शिवथरघळीचा उल्लेख अनेक वेळा आला आहे. मठ महंत शिष्यांचा पत्रव्यवहार, अभंग, स्फुटकाव्य, शिष्यांनी ठेवलेल्या चरित्रात्मक नोंदी, याद्वारे शिवथरघळ हीच दासबोधाची जन्मभूमी आहे याची त्यांना खात्री झाली. मात्र, अशी पुण्यपावन जागा कोणालाच कशी माहीत नाही याची सल शंकररावांना अस्वस्थ करू लागली आणि मग ते झपाट्यासारखे नकाशे घेऊन या कामगिरीवर निघाले. रायगड जिल्ह्यातील बिरवाडी, वरंध, पारमाची, सुनेभाऊ, माझेरी हा भाग त्यांनी अक्षरश: पिंजून काढला. त्या भागातील गावांमधील देशमुख, पाटील, महाजन, खोत यांच्या जुन्या दप्तरातील पत्रव्यवहार नोंदी पडताळून पाहिल्या. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने ते शिवथरच्या परिसरात पोहोचले. गावातल्या वृद्ध मंडळींनी 'रामदास गोसाव्याची घळई' म्हणून जागा दाखवली. जवळच असणारी नलावडे पठारावरची निबिड जंगलातील कल्याणस्वामींच्या भग्न मठाची जागा पाहिली; तसेच शिवाजी महाराजांनी वसवलेली रामनगर पेठेची जागा, चंद्रराव मोऱ्यांचा भग्नावस्थेतील वाडा या खुणांच्या आधारे शंकररावांना खात्री पटली. घळ पूर्ण मातीने बंद झाली होती. त्याची माती काढायला सुरुवात केल्यावर आत गुहा दिसायला लागली आणि शंकररावांनी आनंदाने उडीच मारली. 'शिवथरघळ सापडली, दासबोध जन्मभूमी सापडली' असं म्हणत समर्थांच्या पावनस्पर्शानं पुनित झालेल्या या जागेच्या मातीत अक्षरश: लोळून त्यांनी आपला हर्षानंद व्यक्त केला असं सांगतात. त्यानंतर त्यांनी १९२८ मध्ये आपल्या 'रामदास आणि रामदासी' या मासिकात 'पृथ्वीवरील स्वर्ग मला सापडला' हा लेख लिहून शिवथरघळीचा इतिहास आणि भौगोलिक माहिती प्रसिद्ध केली. १९४०मध्ये महाडचे मामलेदार शिनूत यांनी माझेरी येथे उघड्यावर पडलेली हनुमानाची मूर्ती घळीच्या तोंडाशी आणून ठेवली.

१९६० मध्ये माघ शुद्ध नवमी अर्थात दासबोधजयंतीच्या दिवशी समर्थ संप्रदायातील सत्पुरुष भगवान श्रीधरस्वामी यांच्या हस्ते घळीत श्रीसमर्थ आणि कल्याणस्वामी यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली; पण घनदाट अरण्य, निर्मनुष्य वस्ती, वीज व रहदारीचा रस्ता नाही, जंगली श्वापदांचा वावर यामुळे तिथे राहून रोज पूजा-नैवेद्य करण्याची सोय करणं अवघड होत. तेव्हा नारायणबुवा पोतनीस रामदासी आणि नारायणराव बेंद्रे यांनी घळीतच राहण्यासाठी बांबूंपासून एक पिंजरा तयार केला. समईच्या प्रकाशात रात्री ते दोघे पिंजऱ्यात तर बाहेरून वाघ, अस्वले फिरत असत. १९६३ मध्ये ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांच्या हस्ते भक्तनिवासाची कोनशिला बसवून चार खोल्या बांधण्यात आल्या. त्यानंतर १९६५ पासून समर्थभक्त कै. अप्पा वैद्य यांनी घळीत दासबोध अभ्यासवर्गाची सुरुवात करून 'ज्ञानचळवळीला' खऱ्या अर्थाने प्रारंभ केला. १९८४ पासून बाळसंस्कार शिबिर, १९८५ पासून युवा संस्कार शिबिर, समर्थ विद्यापीठाची स्थापना, प्रापंचिकांसाठी दासबोध शिबिर सुरू झालं. कै. द्वा. वा. केळकर यांच्या अथक मेहनतीनं पत्राद्वारा दासबोध अभ्यासक्रमाद्वारे महाराष्ट्रभर घराघरात लाखो भक्तांपर्यंत दासबाधाची ज्ञानगंगा पोहोचली. शिवथरघळीच्या जीर्णोद्धारात कै. मामा गांगल, अक्का वेलणकर यांचाही मोठा सहभाग होता. दासबोध प्रचाराबरोबरच अलीकडच्या काळात पंचक्रोशीतील गावांसाठी शिवथरघळ येथे धर्मार्थ दवाखाना, मोफत औषधोपचार, आरोग्य शिबिरे, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, महिला बचतगटांना मार्गदर्शन असे अनेकविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. आज हजारो भक्त या स्थानाला भेट देऊन तेथील निवास, भोजनासह अनेक सुविधांचा लाभ घेत आहेत. या व्यापक कार्यविस्ताराद्वारे समर्थांच्या धर्म आणि राष्ट्रकार्याचा वसा पुढे चालवला जात आहे. आत्माराम दासबोध । माझे रूप स्वत:सिद्ध । असता न करावा खेद । भक्त जनी ।। समर्थांनी केलेल्या या उपदेशाची प्रचिती शिवथरघळीच्या पवित्र चैतन्यदायी वातावरणात येते. आजही 'मोबाइल रेंज' आणि व्हॉट्सॲपवर फिरणाऱ्या संदेशांमधील एका तरुण शास्त्रज्ञाच्या माहितीनुसार 'उपग्रह फ्रिक्वेन्सी'ही न पोहोचणाऱ्या 'शिवथरघळ' या अद्भुतस्थानाला भेट देणं ही एक अनुभूती आहे.

*सुंदर मूर्ती सुंदर गुण ।*
*सुंदर कीर्ती सुंदर लक्षण ।*
*सुंदर मठी देवे आपण ।*
*वास केला ।।*
*सुंदर पाहोन वास केला ।*
*दास सान्निध ठेवला ।*
*अवघा प्रांतचि पावन केला ।*
*कृपा कटाक्षे ।।*